# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 01/06/2023 (गुरूवार) सकाळ

---

## चोरी

**१) पो.स्टे. कुही** :— अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील मौजा साळवा रोड कुही येथे दिनांक ३०/०५/२०२३ चे २३.०० वा. दिनांक ३१/०५/२०२३ चे ०४.०० वा. सुमारास यातील फिर्यादी नामे— रविंद्र शंकर थोटे, वय ४३ वर्ष, रा. साळवा रोड कुही याचे दोंन ट्रॅक्टरच्या ०१ पॉवर झोन कंपनीची बॅटरी व सोनिक कंपनीची बॅटरी प्रति बॅटरी किंमती अंदाजे ७०००/— रू. असा एकुण १४,००० रूपयाचा मुद्देमाल **आरोपी नामे— मनिष दशरथ निनावे, वय २४ वर्ष, रा. पंचशिल नगर नागपुर** याने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक देविदास ठमके मो. नं. ८७८८५५३१३९ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील चांडक हॉस्पीटल रेल्वे स्टेशन रोड सावनेर येथे दिनांक ३०/०५/२०२३ चे ११/२७ वा. ते १३/०० वा. सुमारास यातील फिर्यादी नामे— कु. अंजली रणजित कुंभरे, वय १९ वर्षे, रा. मालू कंपनी (कवठा) ता. सावनेर पोस्टे केळवद ही चांडक हॉस्पीटल रेल्वे स्टेशन रोड येथे नर्सिंगचे प्रशिक्षण घेत आहे. फिर्यादीच्या आईने १) ३ ग्रॅम सोन्याचे कानातले टॉप्स किंमती अंदाजे ७०००/—रू. २) ६४ सोन्याचे बारीक पिटीव मण्याची गरसोळी व डोरल ३ ग्रॅम वजनाचे अंदाजे किंमती ७०००/— रू. ३) चांदीच्या पायपट्टया व आकडा किंमती अंदाजे ३०००/— रू असा एकुण किंमती १७०००/— रू. अशाप्रकारे दागीने फिर्यादीचे मामा मनोज पाटील रा. केळवद यांना देण्यास सांगीतले परंतु फिर्यादीला हॉस्पीटल येथे जाण्याकरीता उशीर झाल्याने फिर्यादीने दागीन्यांची पांढरी पॉलीथीन ही सरळ बॅग मध्ये टाकुन हॉस्पीटल येथे घेवून गेली काउंटरचे बाजुला टेबलवर ठेवलेली बॅग काउंटरवर असलेली महिला आरोपी हिने उचलली व ती बॅग काउंटरचे खाली ठेवून वाकुन बॅगमधून सोन्याचे दागीने असलेली पॉलीथीन काढून तीने आपल्या बॅगमध्ये ठेवल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसत आहे महिला आरोपी हिनेच फिर्यादीचे बॅगमधून सोन्याचे ६ ग्रॅम वजनाचे किंमती अंदाजे १४०००/— रू. व चांदीच्या पायपट्टया व आकडा किंमती अंदाजे ३०००/— रू. काढुन चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा हावरे ब. नं. १५४६ मो. क्र. ९९२३३६५६२२ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर